गडकिल्ल्यांचे जतन आणि
संवर्धनाच्या कामाचे संनियंत्रण
करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. : पुवसं-२०२१/प्र.क्र.६६/सां.का.३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०१ जुलै, २०२१

**प्रस्तावना** :- मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. १६ मे, २०२१ रोजी दुर्गप्रेमी प्रतिनिधींसमवेत एक बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांनी राज्यातील गडकिल्ल्यांचे पावित्र्य जपत, ऐतिहासिक वारशाला धक्का न लावता, गडकिल्ल्यांचे जतन व संवर्धन करणे, तसेच किल्ल्यासभोवतालच्या परिसरात पर्यटकांसाठी सुविधा पुरविणे, याचबरोबर जैवविविधता जपण्याच्या सूचना दिल्या. सदर कामांच्या प्रगतिचा आढावा घेण्यासाठी एक सुकाणू समिती गठीत करण्याचे तसेच कामकाजाचे संनियंत्रण मुख्यमंत्री सचिवालयातील संकल्प कक्षातून करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- गडकिल्ल्यांचे जतन व संवर्धनाच्या कामाचा तसेच त्या परिसरातील पर्यटनासाठी सुविधा निर्माण करणे व त्या परिसराचे जैवविविधता जतन व वनीकरण करणे या कामांचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे सुकाणू समितीचे गठण करण्यात येत आहे. :-

| | | |
|---|---|---|
| १. मा. मुख्यमंत्री | - | अध्यक्ष |
| २. मा. उप मुख्यमंत्री | - | उपाध्यक्ष |
| ३. मा. मंत्री, महसूल | - | सदस्य |
| ४. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य | - | सदस्य |
| ५. मा. मंत्री, पर्यटन | - | सदस्य |
| ६. मा. मंत्री, वने | - | सदस्य |
| ७. मा. श्री. छत्रपती संभाजी राजे, संसद सदस्य | - | विशेष आमंत्रित सदस्य |
| ८. श्री. आदेश बांदेकर | - | सदस्य |
| ९. अमुस/प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय | - | सदस्य |
| १०. अमुस, महसूल | - | सदस्य |
| ११. प्रधान सचिव, पर्यटन | - | सदस्य |
| १२. सचिव, सांस्कृतिक कार्य | - | सदस्य - सचिव |
| १३. प्रधान सचिव, वने | - | सदस्य |
| १४. सचिव, रस्ते, सार्वजनिक बांधकाम | - | सदस्य |
| १५. संचालक, राज्य पुरातत्व संचालनालय | - | सदस्य |
| १६. केंद्रिय पुरातत्व विभागाचे प्रतिनिधी | - | सदस्य |
| १७. प्रधान वन संरक्षक (वनबल प्रमुख) | - | सदस्य |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| १८. व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | - | सदस्य |
| १९. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय | - | सदस्य |
| २०. श्री. मिलिंद गुणाजी | - | आमंत्रित सदस्य |
| २१. श्री. ऋषिकेश यादव | - | आमंत्रित सदस्य |
| २२. श्री. माधव फडके | - | आमंत्रित सदस्य |
| २३. श्री. उमेश झिरपे | - | आमंत्रित सदस्य |
| २४. श्री. नितिन बानगुडे पाटील | - | आमंत्रित सदस्य |

मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या मान्यतेने वेळोवेळी सदर बैठकीचे आयोजन करण्यात येईल व सर्व संबंधितांना आमंत्रित करण्यात येईल.

सदर योजनेंतर्गत चालू आर्थिक वर्षात पहिल्या टप्प्यात खालील सहा किल्ल्यांचे सर्वांगिण संवर्धन हाती घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. शिवनेरी, ता. जुन्नर, जि. पुणे
२. राजगड, ता. भोर, जि. पुणे
३. विजयदुर्ग, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग
४. सिंधुदुर्ग, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग
५. सुधागड, ता. सुधागड, जि. रायगड
६. तोरणा किल्ला, जि. पुणे

सुकाणू समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे राहिल :-

१. राज्यातील गडकिल्ल्यांच्या सर्वांगिण विकासासाठी अग्रक्रम ठरविणे.
२. निवड करण्यात आलेल्या किल्ल्यांचे जतन आणि संवर्धनाचे कामकाज सांस्कृतिक कार्य विभागामार्फत करण्यात येईल. पर्यटनाच्या दृष्टिकोनातून विविध सुविधा उपलब्ध करणे व परिसरात पर्यटन केंद्र उभारणे, या विषयीची कार्यवाही पर्यटन उपविभागामार्फत करण्यात येईल. जैवविविधता जपत गडकिल्ले परिसराचे हरितीकरण करण्याची कार्यवाही वन विभागामार्फत केली जाईल. पर्यटनाच्या दृष्टिकोनातून पोहोच रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येतील. तसेच एकूणच या उपक्रमाची प्रसिध्दी माहिती व जनसंपर्क संचालनालयामार्फत करण्यात येईल. या विभागांमार्फत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घेणे.
३. गडकिल्ल्यांचे जतन आणि संवर्धनाचे काम, त्यांचे पावित्र्य जपत, त्यांचा ऐतिहासिक वारसा आणि पुरातत्व वारसाला कोणताही धक्का लागणार नाही, याची खबरदारी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत सदर समिती घेईल.
४. या गडकिल्ल्यांच्या आजूबाजूला असलेल्या ५० कि.मी. अंतरावर असलेली पर्यटन स्थळे, साहसी खेळ, गिर्यारोहण, किल्ल्यांचे ऐतिहासिक संदर्भ, तिथे घडलेला पराक्रम, तिथले वन्यजीव, तिथली वनसंपदा, जैवविविधता जोपासत आजुबाजुची लोकपरंपरा, गडाच्या अनुषंगाने काही लढाया झाल्या असतील तर त्या, या सगळ्या गोष्टींची माहिती संकलित करून गडाच्या पायथ्याशी असलेल्या गावात पर्यटन केंद्र विकसित करणे, मूळ गडाची प्रतिकृती तयार करणे, पूर्वीचे ऐतिहासिक वातावरण निर्माण करणे, लाईट अँड साऊंड शो

Scanned with CamScanner

दाखविणे, याबाबत एक सर्वंकष विकास आराखडा संबंधित यंत्रणांमार्फत मागवून पर्यटन विभागाने संनियंत्रण समितीला सादर करावा.

५. गडकिल्ल्यांच्या परिसरात हेलिकॉप्टरच्या सहाय्याने बिया टाकून नैसर्गिकरित्या या भागात वनराई विकसित करणे तसेच वृक्षारोपण कार्यक्रम राबविणे व हे करित असताना स्थानिक जैवविविधता जपण्याची कार्यवाही वन विभाग, संनियंत्रण समितीच्या मान्यतेने करेल.
६. विभागांकडे उपलब्ध लेखाशिर्षामधून याकामी होत असलेल्या कामांवरिल खर्चाचा आढावा घेणे.
७. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या वेळोवेळी प्राप्त सुचनांनुसार कार्यवाही करणे.

सुकाणू समितीची बैठक दर तीन महिन्यातून एकदा वा मा. मुख्यमंत्री महोदयांच्या सुचनांनुसार घेण्यात येईल.

मा. मुख्यमंत्री सचिवालयातील संकल्प कक्षामार्फत सुकाणू समितीद्वारे घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे व पाठपुरावा करणे याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

निवड करण्यात आलेल्या गड किल्ल्यांच्या जतन व संवर्धनाकरिता येणारा खर्च सांस्कृतिक कार्य विभागाकडून मागणी क्र. झेडडी - २, १०३, पुरातत्वशास्त्र (०१) (०६) राज्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे किल्ले व धार्मिक स्थळे यांची जपणूक व संरक्षण (कार्यक्रम) (२२०५ १३०२) २७ लहान बांधकामे या लेखाशिर्षाखाली उपलब्ध तरतूदीमधून करण्यात येईल. तसेच, पर्यटन विभाग, वन विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कार्यकक्षेतील कामांकरिता येणारा खर्च त्या त्या विभागाकडून संबंधित लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध तरतुदीमधुन भागविण्यात येईल.

सदर शासन निर्णय हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२१०७०११६१८०४१८२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(विलास थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:

१ मा. राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती),
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती), मंत्रालय, मुंबई.

Scanned with CamScanner

९. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व मा. मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१२. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता /लेखापरीक्षा, महाराष्ट्र १, मुंबई.
१४. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता /लेखापरीक्षा, महाराष्ट्र २, नागपूर.
१५. सर्व विभागीय आयुक्त,(महसुल)
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती)
१७. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, विभागीय मंडळ कार्यालय (सर्व)
१८. सर्व जिल्हाधिकारी.
१९. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई.
२०. सर्व अशासकीय सदस्य (मार्फत संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये)
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
२२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
२३. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील सर्व कार्यासने
२४. निवडनस्ती, सां.का.३

Scanned with CamScanner